# श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली जिल्हा - बुलढाणा

## राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित अहवाल

## सत्र :- २०२१-२२

- दिनांक ०९ ऑगस्ट २०२१ रोजी 'ऑगस्ट क्रांति'दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना पथकाने महविद्यालयीन परिसरात 'गाजरगवत निर्मूलन' अभियान राबविले.
- दिनांक १२ ऑगस्ट २०२१ रोजी 'जागतिक युवा दिना'निमित्त राष्ट्रीय सेवा योजना व ग्रामीण रुग्णालय, चिखली यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन युवक-युवतींकरीता एड्स जणजागृती अभियान राबवून एड्सविषयी इत्यंभूत माहिती देण्यात आली. यासाठी भावना कॅम्पबेल मॅडम यांचे विशेष योगदान लाभले.
- दिनांक २० ऑगस्ट २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी वाहनस्थळ परिसरात 'ऑक्सिजन पार्क'ची निर्मिती केली. सदर प्रकल्पांतर्गत विविध प्रकारच्या तुळशींची लागवड केली गेली. या प्रकल्पाचे प्राचार्य व महाविद्यालयाला भेट देणाऱ्या नागरिकांनी विशेष कौतुक केले.
- दिनांक ३० ऑगस्ट २०२१ रोजी रासेयो पथकाद्वारा 'प्रथम स्वच्छता मोहीम' महाविद्यालयीन मुख्य प्रवेशद्वार ते दलीतमित्र समाजभूषण पंढरीनाथ पाटील समाधीस्थळ या परिसरात राबविण्यात आली.
- दिनांक १४ सप्टेंबर २०२१ रोजी 'माझी वसुंधरा' मोहिमेअंतर्गत महाविद्यालयीन परिसरात वड, कडूलिंब, पिंपळ, पाल्म इत्यादी वृक्षांची लागवड करून वृक्षारोपण कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारा राबविण्यात आला.
- दिनांक २४ सप्टेंबर २०२१ रोजी प्रा. डॉ. व्ही. आर. पडवाल व प्रा. डॉ. गणेश मालटे यांचे राष्ट्रीय 'सेवा योजना दिना'निमित्त व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर व्याख्यानातून समाजबांधणीत राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान यावर प्रकाश टाकण्यात आला.
- दिनांक ४ ऑक्टोंबर २०२१ रोजी श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे आयोजित पाणीव्यवस्थापन प्रतिकृति कु. गायत्री नारायण देशमुख व जीवन रवींद्र सपकाळ या रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.
- दिनांक २० ऑक्टोंबर २०२१ रोजी महाविद्यालयीन परिसर व वर्गखोल्यांचे निर्जंतुणीकरण करण्यात आले होते. या मोहिमेत नगरपरिषद, चिखली यांचे विशेष सहकार्य लाभले.
- दिनांक २१ ऑक्टोंबर २०२१ रोजी 'प्रथम कोविड-१९ लसीकरण' कार्यक्रम राबविण्यात आला होता. सदर लसीकरण मोहिमेत एकूण १३९ विद्यार्थी आणि नागरिकांचे लसीकरण करण्यात आले

होते. यापैकी ८९ जणांना covaxin तर ५० जणांना covishield लासईचा डोस देण्यात आला. सदर कार्यक्रमास ग्रामीण रुग्णालय, चिखली येथील कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.

- दिनांक २१ ऑक्टोंबर २०२१ रोजी 'प्लॅस्टिकमुक्त परिसर' महाविद्यालयीन परिसरात हे विशेष अभियान राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी राबविले.
- दिनांक २९ ऑक्टोंबर २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी 'मतदार जणजागृती पथनाट्य' महाविद्यालयीन परिसरात सादर केले होते. या पथनाट्यातून १८ वर्षावरील महाविद्यालयीन युवक-युवतींना मतदानाचा हक्क बजाविण्याचे आवाहन करण्यात आले.
- दिनांक ३० ऑक्टोंबर २०२१ रोजी 'द्वितीय कोविड-१९ लसीकरण' कार्यक्रम राबविण्यात आला होता. सदर लसीकरण मोहिमेत एकूण १२८ विद्यार्थी आणि नागरिकांचे लसीकरण करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास ग्रामीण रुग्णालय, चिखली येथील कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.
- दिनांक ३१ ऑक्टोंबर २०२१ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त एकात्मता व बंधुत्वाची शपथ देऊन 'राष्ट्रीय एकात्मता दिन' साजरा करण्यात आला.
- दिनांक ११ नोव्हेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजनाद्वारा 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन' कार्यशाळा आयोजित केली होती. सदर कार्यशाळेत आय. ए. एस. सौ. अर्चना वानखेडे मॅडम, ग्रामीण विकास विभाग, कोलकाता यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेविषयी मार्गदर्शन केले.
- दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 'संविधांदिन' साजरा करण्यात आला होता. यावेळी डॉ. डी. व्ही. अतकरे यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.
- दिनांक ५ डिसेंबर २०२१ रोजी 'द्वितीय स्वच्छता मोहीम' महाविद्यालयीन परिसरात राबविण्यात आली होती. यावेळी रासेयो स्वयंसेवकांनी संपूर्ण महाविद्यालयीन परिसराची स्वच्छता केली.
- दिनांक ६ डिसेंबर २०२१ रोजी डॉ. राजेशजी बुरुंगे, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या शुभहस्ते महाविद्यालयीन रासेयो पथकाचे उद्घाटन पार पडले. यावेळी प्रा. नीलेश कडू, जिल्हा समन्वयक, रासेयो अमरावती, डॉ. व्ही. आर. पडवाल, जिल्हा समन्वयक, रासेयो बुलढाणा यांची विशेष उपस्थिती लाभली होती.
- दिनांक १५ डिसेंबर २०२१ रोजी जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा येथे आयोजित 'विद्यापीठस्तरीय जिल्हानिहाय एकदिवसीय व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा व रोजगार मार्गदर्शन शिबिरा'त कु. आसमाबी कलीम शहा, कु. भागयश्री वायकोस, संकेत गवई, अलताफ देशमुख या स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.
- दिनांक १५ डिसेंबर २०२१ ते २१ डिसेंबर २०२१ दरम्यान भुवनेश्वर, उडीसा येथे आयोजित 'राष्ट्रीय एकात्मका शिबिरा'त महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकातील कु. गायत्री नारायण देशमुख' या रासेयो स्वयंसेविकेने सहभाग नोंदविला होता.

- दिनांक २९ डिसेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना व डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती तसेच राष्ट्रीय छात्रसेना यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जयंती उत्सवानिमित्त 'रक्तदान शिबिर' आयोजित करण्यात आले होते. यावेळी. ५९ विद्यार्थी व प्राध्यापकांनी रक्तदान करून 'रक्तदान हेच श्रेष्ठदान' हा सामाजिक संदेश दिला.
- दिनांक ३१ डिसेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथकातील स्वयंसेवकांना व्यवसाय करण्यास प्रोत्साहित करण्याच्या हेतूने 'नवउद्योजक आपल्या भेटीला' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी २१ वर्षीय तरुण उद्योजक श्री विठ्ठल मापारी यांनी स्वयंसेवकांना विशेष मार्गदर्शन केले.
- दिनांक ३ जानेवारी २०२२ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त 'आम्ही सावित्रीच्या लेकी' या कार्यक्रमाचे रसेयोद्वारा आयोजन करण्यात आले होते. यावेळी समाजसेविका श्रीमती स्वाती सावजी यांनी आधुनिक भारताच्या निर्मितीत महिलांचे योगदान या विषयावर प्रकाश टाकला.
- दिनांक १२ जानेवारी २०२२ रोजी स्वामी विवेकानंद व स्वराज्यप्रेरिका राष्ट्रमाता जिजाऊ आईसाहेब यांची जयंती रासेयोच्या वतीने साजरी करण्यात आली.
- दिनांक २४ जानेवारी २०२२ रोजी 'राष्ट्रीय बालिका दिना'निमित्त 'बेटी पढाओ समृद्ध समाजनिर्माण करो' हा सामाजिक संदेश देण्यात आला.
- दिनांक २५ जानेवारी २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेद्वारा मतदान जागृती शपथ देऊन 'मतदार दिन' साजरा करण्यात आला.
- दिनांक २३ फेब्रुवारी २०२२ रोजी पळसखेड सपकाळ येथील 'सेवा संकल्प' या मनोरुग्ण आश्रमस १५ किलो उडीदडाळ, १५ किलो तुरडाळ व १० किलो मसुरडाळ तसेच अत्यावश्यक औषधी देणगी स्वरूपात देऊन 'संत गाडगे बाबा जयंती' गाडगे बाबांची दससूत्रीतील एका 'रुग्णाला औषधी' या सूत्रावर अंबल करून साजरी करण्यात आली.
- दिनांक १ मार्च ते २ मार्च २०२२ दरम्यान कला महाविद्यालय, बुलढाणा येथे आयोजित 'जिल्हास्तरीय आपत्ति व्यवस्थापन कार्यशाळे'त महाविद्यालयीन रासेयो पथकातील कु. आसमाबी कलीम शहा, कु. गायत्री नारायण देशमुख, गणेश संतोष सोनोणे, पंकज धनवे यांनी सहभाग नोंदविला.
- दिनांक २७ मार्च २०२२ ते ०४ एप्रिल २०२२ दरम्यान पिंपालखुटा तालुका सिंदखेड राजा येथे आयोजित जिल्हास्तरीय सात दिवसीय कॅम्पमध्ये कु. गायत्री नारायण देशमुख, कु. आसमाबी कलीम शाह, विशाल ज्ञानेश्वर इंगळे, विठ्ठल बाजिराव मुजमूले या रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

Prof. S. S. Kale
NSS Programme Officer
Shri Shivaji Sci. & Arts College

PRINCIPAL
Shri Shivaji Science & Arts
College, Chikhli, Dist.Buldana